# पंचमहाव्रत
# जीवन रूपांतरणाची पाच सूत्रे

**ओशो रजनीश**

अनुवाद

**मंजूषा आमडेकर**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

Panchmahavrat : Jeevan Rupantaranachi Paach Sutre : Osho Rajneesh
Copyright © 1970, 2016 OSHO International Foundation. All Rights reserved.
OSHO is registered trademark of OSHO International Foundation, used under license.
Originally published in Hindi under the title : Jyon Ki Tyon Dhari Deenhi Chadariya.
First published in Marathi by Riya Publications in arrangement with OSHO International Foundation.

**पंचमहाव्रत : जीवन रूपांतरणाची पाच सूत्रे :** ओशो रजनीश

अनुवाद : मंजूषा आमडेकर

**प्रकाशक**

रिया पब्लिकेशन्स्,

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,

शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.

riyapublications@gmail.com

www.ajabgroup.com

**अनुवाद**

मंजूषा आमडेकर

बी-६, सुहृद सोसायटी,

इरंडवणे, पुणे-४.

फोन नं. ०२०-२५४१०२३८ मो. नं. : ९४२३००२२८१

**अक्षरजुळणी**

अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**

चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**

ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**

ऑगस्ट २०१६

**किंमत**

₹ १००/-

# पंचमहाव्रत
# जीवन रूपांतरणाची पाच सूत्रे

## पहिले प्रवचन

# *अहिंसा*

माझ्या सुहृदांनो,

अहिंसा, अपरिग्रह, अचौर्य, अकाम आणि अप्रमाद– हे सगळे नकारात्मक शब्द आहेत, निगेटिव्ह आहेत. ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. खरं म्हणजे, साधना ही नकारात्मकच असू शकते, निगेटिव्हच असू शकते. त्यातून होणारी प्राप्ती पॉझिटिव्ह असेल, विधायक असेल. जे मिळेल ते प्रत्यक्षात असेल आणि आपल्याला ज्याचा त्याग करायचा आहे, ते प्रत्यक्षात नाहीच आहे.

अंधकार गमवायचा आहे आणि प्रकाश मिळवायचा आहे. असत्य त्यागायचं आहे आणि सत्य मिळवायचं आहे. यावरून आणखी एक गोष्ट लक्षात घेण्याची गरज आहे, ती अशी की, नकारात्मक शब्दांमुळे आपल्याला जाणीव होते की अहिंसा हा आपला मूळ स्वभाव आहे, तो मिळवायची गरज नाही, कारण तो मुळात आहेच. हिंसेला प्राप्त करून घेण्यात येतं, तो काही आपला स्वभाव नाही. ती अर्जित आहे, अचिव्ह्ड. हिंसक बनण्याकरता आपल्याला काहीतरी कृती करावी लागते. हिंसा ही आपली मिळकत आहे. आपण तिला शोधून काढलेलं आहे, तिला आपण निर्माण केलेलं आहे. पण अहिंसा ही काही आपली मिळकत असू शकत नाही. त्यामुळे फक्त हिंसा घडली नाही म्हणजे झालं, मग जे बाकी उरेल ती अहिंसाच असेल.

त्यामुळे साधना नकारात्मक आहे. जे आपण मिळवलेलं आहे आणि जे मिळवण्याजोगं नाहीच आहे, ते आपल्याला गमवायचं आहे, सांडून टाकायचं आहे. जसं, एखादा मनुष्य हा मुळात हिंसक असत नाही, असू शकत नाही. कारण दु:ख मिळवायची कुणाचीच इच्छा नसते आणि हिंसा माणसाला फक्त

दु:खाकडेच खेचून नेत असते. हिंसा ही ॲक्सिडेंट आहे, सांयोगिक आहे. तो काही आपल्या जीवनाचा प्रवाह नाही. त्यामुळे जो कुणी हिंसक असेल तो काही चोवीस तास हिंसक असू शकत नाही. तसंच, अहिंसकही चोवीस तास अहिंसक राहू शकत नाही. हिंसक दिवसरात्र हिंसक बनून राहू शकत नाही, कारण त्यालाही काही परिघांच्या आत अहिंसक बनूनच जगावं लागतं. खरं पाहायला गेलं, तर तो हिंसा करतो तीही कुणाच्या तरी बाबतीत त्याला अहिंसकपणे राहता यावं याचसाठी करत असतो. कुणीही माणूस चोवीस तास चोऱ्या करत बसू शकत नाही; तो मुळात चोरी करतो तीच एवढ्यासाठी की त्याला काही काळ तरी चोरी न करता जगता यावं म्हणूनच. चोराचं ध्येय अचौर्यच असतं आणि हिंसक व्यक्तीचं ध्येयही अहिंसाच असतं. त्यामुळेच हे सगळे शब्द नकारात्मक आहेत.

धर्माच्या भाषेत फक्त दोनच शब्द सकारात्मक आहेत, बाकी सगळे शब्द नकारात्मक आहेत. त्या दोन्ही शब्दांना मी चर्चेतून वगळलेलं आहे. एक आहे, 'सत्य' आणि दुसरा 'ब्रह्मचर्य', हे दोन्ही शब्द विधायक आहेत, पॉझिटिव्ह आहेत.

आता सुरुवातीलाच एक गोष्ट ध्यानात घ्यायची आहे की, मी ज्या पाच शब्दांची निवड केलेली आहे, ज्यांना मी पंच- महाव्रत असं म्हणतो, ते नकारात्मक शब्द आहेत. हे पाच जेव्हा सुटतील, तेव्हा आतमध्ये जे प्राप्त होईल ते असेल सत्य आणि जे बाहेर प्राप्त होईल ते ब्रह्मचर्य असेल.

या पाच गोष्टी सुटतील तेव्हा सत्य आत्माच बनून जाईल आणि ब्रह्मचर्य आचरण होऊन जाईल. पण ते दोन्ही शब्द विधायक आहेत. आपण जे अंतर्यामी जाणून घेणार आहोत त्याला सत्य म्हणावं आणि आपण जे काही बाह्यत: जगणार आहोत ते असेल ब्रह्मचर्य. ब्रह्मचर्याचा अर्थ आहे – ब्रह्मासारखी चर्या, ईश्वरासारखं आचरण. जो ईश्वरस्वरूपच होऊन जाईल, तोच ईश्वरासारखं आचरण करेल. सत्य याचा अर्थ आहे – ईश्वरस्वरूप होणं, ब्रह्मरूप होणं. जो ईश्वरासारखा होईल, त्याची जी चर्या असेल तेच ब्रह्मचर्य असेल. ते आचरण ब्रह्मासारखं असेल. हे दोन्ही शब्द धर्माच्या भाषेत विधायक आहेत, पॉझिटिव्ह आहेत; बाकी उर्वरित संपूर्ण धर्माची भाषा नकारात्मकच आहे. आपल्याला येत्या पाच

दिवसांत या पाच नकारांवर विचार करायचा आहे. आज आपण पहिल्या नकाराचा म्हणजेच, अहिंसेचा विचार करणार आहोत.

जर नीट समजून घेतलं तर लक्षात येईल की अहिंसेवर विचार करण्यासारखं काहीच नाहीए. विचार करायचा झाला तर तो फक्त हिंसेवर करता येऊ शकतो, आणि त्यातही, केवळ हिंसा न करण्याबाबत विचार केला जाऊ शकतो. पक्कं लक्षात घ्या की, अहिंसा याचा अर्थ केवळ इतकाच आहे – हिंसेचं नसणं, हिंसेचा ॲबसेन्स, अनुपस्थिती – हिंसेचा अभाव.

हे अशा प्रकारे समजून घ्या. एखाद्या डॉक्टरला जर आपण आरोग्याची व्याख्या विचारली, त्याला आरोग्य म्हणजे काय, असं विचारलं, तर तो काय सांगेल? तसं पाहिलं तर जगात आरोग्य विज्ञान खूपच विकसित झालेलं आहे, पण तरीही आरोग्याची व्याख्या कुणालाही करता येणार नाही. त्यामुळे डॉक्टरला जर आरोग्याची परिभाषा विचारली तर तो म्हणेल, जिथे आजार नसेल ते आरोग्य. पण यात तर आजाराबाबत बोललं गेलं आहे, आरोग्याबाबत नाही. हे झालं आजाराचं नसणं. ही आजारपणाची व्याख्या असू शकते. आजारपण म्हणजे काय, याची ही परिभाषा असू शकते. पण आरोग्य म्हणजे काय, असं विचाराल, तर आरोग्याची काही व्याख्या असू शकत नाही. फार फार तर आपण इतकंच म्हणू शकतो की, एखाद्या माणसाला कोणताही आजार नसेल तर त्याचं आरोग्य उत्तम आहे.

धर्म तर परम स्वास्थ्य आहे! त्यामुळे धर्माचीही व्याख्या करता येणार नाही. सगळ्या व्याख्या अधर्माच्याच आहेत. या पाच दिवसांत आपण धर्माचा विचार करणार नाही आहोत. अधर्माचा विचार करणार आहोत.

विचारातून, जाणिवेतून अधर्म निघून गेला, तर निर्विचार अवस्थेत जे काही राहतं त्याला धर्म असं म्हणतात. त्यामुळे जिथे कुठे धर्मावर चर्चा होते, तिथे विनाकारणच काथ्याकूट केला जातो. चर्चा झालीच, तर ती फक्त अधर्मावरच होऊ शकते. धर्मावर चर्चा होऊच शकत नाही. आजारपणावर चर्चा केली जाऊ शकते, आरोग्यावर नाही. आरोग्याबाबत समजून घेता येऊ शकतं, आरोग्यपूर्ण आयुष्य जगता येऊ शकतं, आरोग्यसंपन्न होता येऊ शकतं, पण आरोग्यावर चर्चा होऊ शकत नाही. तसंच, धर्माबाबत जाणून घेता येतं, धर्मानं जगता येऊ शकतं,

धार्मिक होता येतं, पण धर्मावर चर्चा होऊ शकत नाही. त्यामुळे खरं पाहायला गेलं तर सगळी धर्मशास्त्रं ही अधर्मावरच चर्चा करत असतात. धर्मावर कुणीच काही चर्चा करत नाही.

तेव्हा आपण आता पहिल्या अधर्माची चर्चा करूया – हिंसा. आणि जो जो हिंसक आहे, त्या प्रत्येकासाठी हे पहिलं व्रत आहे. सर्वप्रथम आपण हे समजून घ्यायचं आहे, की आज आपण जो काही विचार करणार आहोत, तो स्वत:ला हिंसक मानूनच करणार आहोत. त्याखेरीज या चर्चेला काहीही अर्थ नाही. तसं पाहायला गेलं तर आपण हिंसकच आहोत. आता आपण हिंसक आहोत म्हणजे काय, या बाबतीत भेद असू शकततात. हिंसेला इतके पदर आहेत, इतकी सूक्ष्म रूपं आहेत की कितीदा तरी असंही असू शकतं की, ज्याला आपण अहिंसा म्हणतो किंवा समजतो, तो प्रत्यक्षात हिंसेचाच एखादा सूक्ष्म प्रकार असू शकतो. आणि त्याचबरोबर असंही असू शकतं की आपण ज्याला हिंसा म्हणतो, ते अहिंसेचंच खूप मोठं स्थूल रूप असू शकेल. आयुष्य फारच गुंतागुंतीचं आहे.

उदाहरणार्थ, गांधीजींच्या अहिंसेला मी हिंसेचंच एक सूक्ष्म रूप मानतो आणि कृष्णाच्या हिंसेला अहिंसेचंच स्थूल रूप मानतो. आपण या विषयावर सखोल विचार केला तर लक्षात येईल. अहिंसेवरती हिंसकालाच विचार करावा लागेल. त्यामुळेच हिंसकांच्या जमातीमधूनच अहिंसेचा विचार चर्चेला आणला गेला, हे समजून घेणं प्रसंगानुकूल होईल. जगात जिथे हिंसा प्रचंड प्रमाणात होत होती, तिथूनच अहिंसेचा विचार निर्माण झालेला आहे.

खरं तर, हिंसकांनाच अहिंसेबाबत विचार करणं भाग पडलेलं आहे. चोवीस तास जे लोक हिंसेमध्ये मश्गूल होते, त्यांच्या लक्षात आलं की हा काही आपला मूळ स्वभाव नाही. खरं म्हणजे, हातात तलवार असेल, क्षात्रधर्माचं पालन करणारं मन असेल, तर हिंसा हा आपला त्रास आहे, हिंसेमुळे दु:ख होतं, हे कळायला फार वेळ लागणार नाही. हिंसा हेच काही जीवन नाही. हिंसेमध्ये आपला आनंद सामावलेला नाही.

आजचं व्रत हिंसकांसाठी आहे. तरीही जे स्वत:ला अहिंसक मानतात, तेही आजच्या व्रतावर विचार करताना आढळतील! मी तर असंच मानून चालतोय की आज आपण इथे हिंसक लोकच जमा झालेलो आहोत. आणि मी जेव्हा हिंसेच्या

अनेक रूपांविषयी तुमच्याशी बोलेन तेव्हा तुम्ही त्यातील कुठल्या प्रकारचे हिंसक आहात ते तुमच्या लक्षात येईलच. आणि अहिंसक होण्याबाबतची पहिली अट ही आहे की, आपल्यातील हिंसेच्या भावनेला जिथल्या तिथेच समजून घेणे. कारण जी व्यक्ती हिंसेला व्यवस्थितपणे समजून घेईल ती व्यक्ती हिंसक राहूच शकत नाही. हिंसक बनून राहण्यातली एकच युक्ती आहे, एकच टेक्निक आहे, ते असं की आपल्या हिंसेलाच अहिंसा मानून चालणं. म्हणून तर असत्य सत्याची शाल पांघरून वावरत असतं. आणि हिंसा, अहिंसेचं रूप घेऊन हिंडत असते. माणसाला ही भूल पडू शकते.

मी एक कथा ऐकलेली आहे. ही कथा सिरीअन आहे.

सौंदर्य आणि कुरुपतेच्या देवतांना जेव्हा परमेश्वरानं बनवलं, आणि त्या पृथ्वीवर उतरून आल्या, तेव्हा त्यांची वस्त्रं धूळ-मातीनं माखून गेली असावीत. मग एका सरोवराकाठी आपापली वस्त्रं उतरवून ठेवून त्या स्नान करण्यासाठी सरोवरात उतरल्या. आपली वस्त्रं बदलली जाऊ शकतात, याचा मुळात सौंदर्याच्या देवीला पत्ताच नव्हता. कारण सौंदर्याला ना आपल्या वस्त्रांचं भान असतं, ना शरीराचं. देहाचा बोध असतो तो फक्त कुरुपतेलाच. त्यामुळे वस्त्रांची चिंता फक्त कुरुपतेलाच असते. कारण कुरुपता वस्त्र आणि देह यांच्या आधारानं आपली कुरुपता लपवण्याची धडपड करत असते. सौंदर्याची देवता सरोवरात स्नान करता करता बरीच पुढे पोहत गेली. तिकडे कुरुपतेच्या देवतेनं ही संधी तात्काळ हडपली. ती चटकन बाहेर आली आणि सौंदर्याच्या देवतेची वस्त्रं अंगावर चढवून तिथून निघून गेली. पण सौंदर्याची देवता जेव्हा पाण्यातून बाहेर आली तेव्हा चक्रावूनच गेली. तिची वस्त्रं तिथे नव्हतीच. ती तशीच नग्नपणे उभी होती. तितक्यात गाव जागं व्हायला सुरुवात झाली. आता गावातले रस्ते गजबजून जायला लागले होते. कुरुपतेची देवता सौंदर्याच्या देवतेची वस्त्रं घेऊन पळून गेलेली असल्यामुळे तिला नाइलाजानं कुरुपतेची वस्त्रं अंगावर चढवणं भाग पडलं. कथा सांगते, की तेव्हापासून ती कुरुपतेच्या देवतेचा पाठलाग करत, तिला शोधत फिरतेच आहे; पण अजून काही त्या दोघींची गाठभेट झालेली नाही. कुरुपता अजूनही अंगावर सौंदर्याच्या देवतेची वस्त्रं घालून मिरवते आहे आणि सौंदर्याची देवी तशीच नाईलाजास्तव कुरुपतेची वस्त्रं घालून कशीबशी वावरते आहे.

प्रत्यक्षात असत्यालाही जेव्हा जगाच्या समोर यायचं असतं, तेव्हा त्याला सत्याचा चेहरा उसना घ्यावा लागतो! असत्यालाही जगापुढे उभं राहताना सत्याची लकब अंगीकारावी लागते. तसंच, हिंसेलाही जगापुढे येताना अहिंसेच्या रूपातच यावं लागतं. त्यामुळे अहिंसेच्या दिशेनं पाऊल टाकताना सर्वात प्रथम जर काही करायचं असेल तर, आपल्याला हिंसेची रूपं ओळखायला शिकलं पाहिजे. त्यातही तिचे जे अहिंसक चेहरे आहेत, नॉनव्हायोलंट चेहरे, ते ओळखणं जास्त आवश्यक आहे. हिंसा कुणालाही झालं तरी सरळ सरळ फसवू शकत नाही. जगात कुठलंही पाप थेटपणानं करून कुणाच्याही डोळ्यात धूळफेक करता येत नाही. पापालाही पुण्याच्या आड दडूनच लोकांना फसवावं लागतं. ही पुण्याच्या गुण-गौरवाची बाब आहे. यावरून स्पष्टपणे लक्षात येतं की पाप जरी जिंकलं, तरी ते पुण्याचा मुखवटा चढवूनच जिंकू शकतं. पण सदैव जिंकतं ते फक्त पुण्यच! मग ते पापाच्या वर मुखवट्यासारखं चिकटून का होईना, किंवा स्वत:चा अंतरात्मा बनून का होईना, नेहमी पुण्याचीच जीत होते. पाप कधीच जिंकत नाही. पाप स्वत:पुढेच हार मानून बसलेलं आहे. तसंच, हिंसेची कधी जीत होऊ शकत नाही. पण जगातून हिंसा समूळ नष्टही होत नाही, कारण आपण हिंसेचे कैक अहिंसक मुखवटे शोधून काढलेले आहेत. त्यामुळे सर्वप्रथम आपल्याला हिंसेच्या अनेकानेक चेहऱ्यांना ओळखायला शिकून घेतलं पाहिजे.

हिंसेचं सर्वात पहिलं रूप, पहिलं डायमेन्शन किंवा पहिला पैलू जो आहे, तो अत्यंत खोल आहे, तिथवर जाऊन पोहोचलं पाहिजे. दुसऱ्या माणसाला दुसरा किंवा परका मानण्यानं हिंसेला सुरुवात होते : टू कन्सीव्ह अदर, ॲज अ अदर. म्हणजे समजा मी जर म्हणालो की तुम्ही दुसरे आहात, तर मी तुमच्या बाबतीत हिंसकच झालो. खरं तर, दुसऱ्याच्या बाबतीत अहिंसक होणं हे अशक्यच असतं. आपण फक्त स्वत:च्या बाबतीत अहिंसक असू शकतो, हा आपल्या स्वभावाचाच भाग आहे. आपण केवळ स्वत:च्या प्रति अहिंसक असू शकतो, दुसऱ्यांच्या बाबतीत आपण अहिंसक असूच शकत नाही. तसं पाहायला गेलं तर अहिंसक होण्याचा प्रश्नच येत नाही, मुळात आपण दुसऱ्या माणसाला दुसरा म्हणण्यानेच हिंसेला सुरुवात केलेली असते. फक्त ही हिंसा अत्यंत सूक्ष्म, अत्यंत खोल असते.